# Wel-Come

# महात्मा ज्योतिबा फुले

- ज्योतीबा फुले यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण
- त्याच गावी म. फुल्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला.
- जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते.
- शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते,
- त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी, पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले
- जोतीराव नऊ महिन्यांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले.
- जोतीबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीबाईशी झाला.
- प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला.
-

- १८४२ मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला.
- जोतीराव करारी वृत्तीचे होते. त्यांस गुरुजनांविषयी व वडीलधाऱ्या माणसांविषयी फार आदर वाटत असे.
- शाळेतील शिस्तप्रिय, हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता.
- त्यावेळी पुण्यात बरेच कबीरपंथी फकीर येत असत. चांगले लिहायला व वाचायला येणाऱ्या जोतीबाकडून काही कबीरपंथी फकीर रोज महात्मा कबीरांचा 'बीजमती' हा ग्रंथ वाचून घेत.
- त्यामुळे जोतीरावांच्या मनावर कबीराच्या विचारांचा प्रभाव
- कबीराचे अनेक दोहे त्यांना पाठ झाले.

त्यातील एक "नाना वर्ण एक गाय, एक रंग है दूध, तुम कैसे बम्मन हं, कैसे सूद "[२]

# ज्योतिबा फुले यांचे कार्य

- मानवी हक्कावर इ.स.१७९१ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक त्यांच्या वाचनात आले.
- त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला.
- सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले.
- त्यामुळेच विषमता दूर करण्यासाठी स्त्रीशिक्षण आणि मागासलेल्या जातीतील मुलामुलींचे शिक्षण यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले. सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्चित मत आणि अनुमान होते.
- ‘कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व
- जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे’ असे रोखठोक प्रतिपादन

# 1) मुलींसाठी पहिली शाळा

- पुण्यातील बुधवार पेठेत तात्याराव भिडे यांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली
- शाळा सुरू केली (1848)
- हजारो वर्षापासून चा स्त्रियांच्या जीवनातील काळाकुट्ट अंधार नष्ट करण्यासाठी प्रयत्न
- सावित्रीबाई फुले यांना शिकवून शाळेत शिक्षक म्हणून नियुक्त केले
- सावित्रीबाई फुले यांना पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून ओळखले जाते
- सावित्रीबाईंनी ज्योतिबा फुले यांच्या कार्यात सहकार्य केले
- शाळेत शिकवण्यास जाताना सावित्रीबाईंना त्रास दिला

# 2)पुण्यातील नाव्हयंचा संप

- बाल-जरठ विवाहप्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा-तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या.
- ब्राह्मण समाजात विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता.
- पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सतीजावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करून कुरूप बनविले जाई.

# 3) बाल हत्या प्रतिबंधक गृह 1863

- विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुणातरी नराधमाच्या शिकार बनत.
- गरोदर विधवा म्हणून समाज छळ
- जन्माला येणाऱ्या मुलाला यातनांशिवाय काहीच मिळत नसे
- या भीतीमुळे पीडित महिला एक तर आत्महत्या करत किंवा भ्रूणहत्या करत
- म्हणून ज्योतिरावांनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले व पीडित महिलांना मायेचा आधार दिला
- बाल हत्या प्रतिबंधक गृहातील सर्वच मुलांना सावित्रीबाई आपले मुल समजत

- याच बाल हत्या प्रतिबंधक गृहातील काशीबाई नावाच्या विधवा धर्मँ महिलेचा यशवंत नावाचा नावाच्या मुलाला फुले दाम्पत्याने दत्तक म्हणून घेतले या प्रतिबंधक गृहातील

# अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली 1852

- हजारो वर्षापासून भारतातील अस्पृश्य समाज शिक्षणा पासून वंचित होता त्याला शिक्षण देण्यासाठी ज्योतिबा फुले यांनी पुण्यात अस्पृश्यांसाठी अनेक शाळा सुरू केल्या

# पुण्यामध्ये एक पुनर्विवाह घडवून आणला 1864

- महात्मा ज्योतिबा फुले यांनी पुण्यात एका पुनर्विवाह चे आयोजन केले
- पुण्यातील गोखले यांच्या वाड्यात रघुनाथ जनार्धन व नर्मदा यांचा पुनर्विवाह लावून दिला

# पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला1868

- 1868  पुण्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती सर्वत्र दुष्काळ सदृश्य परिस्थिती होती तेव्हा ज्योतिबा फुले यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला

# कामगार संघटनेची स्थापना

- नारायण मेघाजी लोखंडे यांच्या मदतीने कामगारांच्या . प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी बॉम्बे मिल असोसिएशन या संघटनेची स्थापना केली

# हंटर कमिशन पुढे साक्ष

- भारतामध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे अशी मागणी हंटर कमिशन च्या पुढे महात्मा ज्योतिबा फुले यांनी केली 1888 चाली जनतेने ज्योतिबा फुले यांनां महात्मा ही पदवी दिली

# अस्पृश्य लोकांना विद्या शिकविण्याकरिता मंडळ स्थापन

- महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत:
- विद्येविना मती गेली ।
  मतींविना नीती गेली ।
  नीतीविना गती गेली ।
  गतीविना वित्त गेले ।
  वित्ताविना शूद्र खचले।
  इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

# दीनबंधू हे वृत्तपत्र चालविले 1877

- ज्योतिबा फुले यांनी त्यांचे मित्र कृष्णराव भालेकर
- यांच्या मदतीने दीनबंधू नावाचे वृत्तपत्र चालवले या वृत्तपत्रातून सत्यशोधक चळवळींचा प्रसार केला

# ब्रिटिश राजाच्या दरबारात शेतकऱ्यांचे घराणे मांडले

- राणी व्हिक्टोरिया चा पुत्र ड्युक ऑफ कॅनॉट याच्या कार्यक्रमात महात्मा ज्योतिबा फुले यांनी शेतकऱ्यांच्या गणवेशात जाऊन शेतकऱ्यांची कैफियत मांडली


Thank You!